दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • सोमवार दि.१५ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ११३ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Monday 15 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 113 • Pages 4 • Rate 4 Rs

# ई-वाहनांचा चुकीचा टोल परत करा, 'आरेरावी' करणाऱ्या टोलचालकांवर दंडात्मक कारवाई करा!

## आ.राहुल कुल यांची हिवाळी अधिवेशनात मागणी; सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांकडून सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन

दैनिक वादळ वार्ता

नागपूर । प्रतिनिधी

हिवाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान आमदार राहुल दादा कुल यांनी राज्यातील महत्त्वाच्या महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहने चालकांकडून केली जाणारी टोल वसुली, टोलचालकांची मनमानी आणि रस्त्यांच्या दर्जाबाबत अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करून सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधले. त्यांच्या सर्व जनहितकारी मागण्यांवर सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) श्री. दादाजी भुसे यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.आमदार राहुल कुल यांनी प्रामुख्याने मुंबई - पुणे द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्ग आणि शिवडी - न्हावाशेवा अटल सेतू या प्रमुख महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहन (एत) धारकांकडून वसूल करण्यात आलेल्या चुकीच्या टोलचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी मागणी केली की, केवळ या तीन महामार्गांपुरती मर्यादित न राहता, सर्वच महामार्गांवर ईव्ही धारकांकडून चुकीच्या पद्धतीने वसूल केलेला टोल तातडीने परत करण्यात यावा. भविष्यात टोल वसुलीच्या चुकीच्या पद्धती रोखण्यासाठी आणि पारदर्शकता आणण्यासाठी संबंधित टोल चालकांवर दंडात्मक कारवाई करावी,





अशी आग्रही मागणी त्यांनी केली.टोल बूथवरील MSRDC आणि इतर टोल चालकांच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करताना आमदार कुल यांनी अनेक महत्त्वपूर्ण तक्रारी मांडल्या. टोल बूथवर टोलचालकांकडून नागरिकांशी आरेरावी केली जाते. तसेच, रस्त्याचा दर्जा राखला जात नाही आणि प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या सुविधांचा अभाव असतो. टोल वसुलीच्या वेळी संबंधित अटीशर्तींचे पालन केले जात नाही. अशा अटीशर्ती न पाळणाऱ्या टोलचालकांवर तक्रार आल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, असे त्यांनी सभागृहात सांगितले.टोल बूथ हे पोलिसांच्या वाहने तपासणी आणि दंडवसुली करण्याचे एक केंद्र बनले आहे, याकडेही आमदार कुल यांनी लक्ष वेधले. बूथवर वाहन पोलिसांनी तपासणी जरूर करावी, परंतु या दरम्यान ट्रॅफिक नियमांचे काटेकोर पालन करणे आणि वाहतूक सुरळीत ठेवणे अपेक्षित आहे, ज्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल. आमदार राहुल कुल यांनी उपस्थित केलेल्या या सर्व महत्त्वपूर्ण मागण्यांवर सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) श्री. दादाजी भुसे यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले असून, यामुळे टोल वसुली प्रक्रियेत पारदर्शकता येऊन सामान्य नागरिक आणि ईव्ही धारकांना मोठा दिलासा मिळेल अशी अपेक्षा आहे.

# मी रमाई या नाट्य प्रयोगाने प्रियांका उबाळे यांनी त्याग मूर्ती माता रमाईंचा जीवनपट उलगडला

परळी । प्रतिनिधी

महामानव,विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेल्या बाबासाहेबांच्या पत्नी माता रमाईंचा जीवनपट सिनेअभिनेत्री प्रियंका उबाळे यांनी मी रमाई या नाट्य प्रयोगातून उलगडला.परळी येथे दिनांक १४ डिसेंबर रोजी संपन्न झालेल्या या एकपात्री नाट्यप्रयोगास परळीकर रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.बुद्धभूमी चारिटेबल ट्रस्ट आयोजित व प्रकाश वाघ निर्मित मी रमाई या एकपात्री नाट्यप्रयोगाचे परळी वैजनाथ शहरात दिनांक १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वा.लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे आयोजन करण्यात आले होते.आहे.या नाट्यप्रयोगाचे निर्माते प्रकाश वाघ आहेत तर सिनेअभिनेत्री प्रियंका उबाळे यांनी माता रमाईची उत्कृष्ट भुमिका सादर केली.

या नाटकाचे दिग्दर्शक=प्राध्यापक



रमाकांत भालेराव सर आहेत. लेखिका व रमाबाई आंबेडकर यांच्या मुख्य भूमिकेत आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे या आहेत. त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये भूमिका साकारलेल्या आहेत आम्ही जरांगे,डिलिव्हरी बॉय, प्रेमवारी, मलिका = बाळूमामाच्या नावानं चांगभलं,ज्ञानेश्वर माऊली,साता जन्माच्या गाठी,अशा अनेक मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. तसेच त्यांचे शिक्षण डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थिनी असून त्यांनी अनेक वर्ष रमाई च्या आयुष्यावर संशोधन करुन रडणाऱ्या नाही तर लढणाऱ्या रमाईचा इतिहास सांगणारे भारतातील पहिले नाटक उभे केले आहे.घराघरात धाडसी रमाईचा इतिहास पोहोचवणारं ही संकल्पना घेवून प्रियंका उबाळे यांचा महाराष्ट्र दौरा सुरु आहे.या कार्यक्रमाला परळी शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांचे विशेष सहकार्य लाभले.नाटकास शहरातील बहुजन समाजाचे महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नाटकाचे तांत्रिक कलावंत पार्श्व संगीत =अनिल दुधाटेप्रकाश योजन,=माणिकचंद थोरात,नेपथ्य =विशाल धनंजय कहळे ,रंगभूषा = कमलाकर चव्हाण काजल चव्हाण,प्रगती गोधणे यांनी केल्या आहेत.

# सांगवी येथे अनेक युवकांचा ॲड.दिनेश बिक्कड यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश

दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात आम आदमी पक्षाला चांगले दिवस येत असुन आम आदमी पक्षाचे केज तालुकाध्यक्ष अड.दिनेश बिक्कड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत सांगवी येथे अनेक युवकांनी आम आदमी पार्टी पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी रविवारी

सांगवी पाटी येथे केज तालुका आम आदमी पार्टीच्या वतीने प्रवेश कार्यक्रम संपन्न झाला. केज तालुकाध्यक्ष ॲड. दिनेश बालाजी बिक्कड यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील युवकांनी आम आदमी पार्टीत जाहीर प्रवेश केला.यामध्ये देवगाव येथील विद्यमान ग्रामपंचायत सदस्य रामेश्वर तुकाराम नागरगोजे,पिंपळगाव चे बाळासाहेब



गायकवाड,

गोविंद भैया देशमुख, पांडुरंग जाधव,अभिजीत केदार,चेअरमन हनुमंत इंगळे,शशीकांत घोळवे, अनिल बिक्कड,बजरंग बाप्पा देशमुख व इतर युवकांचा समावेश आहे.

या सर्व कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे केजतालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लढवण्यासाठी आम आदमी पार्टीची टीम पूर्ण ताकदीने सज्ज झाली आहे.यासर्व नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे हार्दिक अभिनंदन करत पुढील राजकीय सामाजिक वाटचाली साठी केज तालुकाध्यक्ष अड.दिनेश बिक्कड यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बीड शहर व परिसरातील बारवांना महाराष्ट्र बारव समितीचे अशासकीय सदस्य श्री.रोहन काळे यांची प्रत्यक्ष पाहणी

दैनिक वादळ वार्ता

बीड । प्रतिनिधी

बारव निर्मिती ही तत्कालीन राज्यकर्त्यांची उत्कृष्ट जलनीती होती. होळकरशाहीतील थोर शासनकर्ती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बारव निर्मितीचे भारतभर जाळे निर्माण केलेले आहे.काळाच्या ओघात दुर्लक्षामुळे बारवा नामशेष होत चालल्या आहेत. बारवांचे जतन व संवर्धन करणे म्हणजे केवळ जलसाठा टिकवणे नव्हे, तर इतिहास जिवंत ठेवणे होय. हाच विचार घेऊन शासन स्तरावर महाराष्ट्र बारव समिती गठित करण्यात आली आहे. बारव संवर्धनासाठी स्थानिक नागरिकांनी पुढाकार



घेणे आवश्यक आहे.

राज्यस्तरीय महाराष्ट्र बारव समितीचे अशासकीय सदस्य श्री. रोहन काळे (मुंबई) यांनी बीडला भेट दिली. यावेळी त्यांनी खंडेश्वरी मंदिर बारव, फुलईनगर येथील कलिंदेश्वर बारव, पापनेश्वर बारव, शनी मंदिर बारव, पेठ बीड येथील चमन बाग तसेच शिदोड परिसरातील बारवांची प्रत्यक्ष पाहणी केली.

या प्रसंगी श्री. रोहन दादा काळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र बारव मोहीम बीड जिल्हा समन्वयक पदी सचिन लुचारे यांची निवड करण्यात आली. बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र बारव मोहीम व स्वच्छता मोहिमेमध्ये सक्रिय असणाऱ्या आई तुळजाभवानी प्रतिष्ठान, बीडचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते.बारव भेटीच्या वेळी अंबड येथील होळकरशाही अभ्यासक रामभाऊ लांडे, बीड येथील दुर्ग अभ्यासक कचरू चांभारे, सामाजिक कार्यकर्ते रामनाथजी खोड, बारव समितीचे सदस्य, बीड मधील महेश खाडे, पत्रकार व समाजसेवक दत्ता प्रभाळे यांच्यासह अनेक सक्रिय सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोल्हेवाडी येथे लोकनेते स्व.गोपिनाथरावजी मुंडे यांच्या जयंती निमित्त शालेय साहित्य वाटप

दैनिक वादळ वार्ता

केज । प्रतिनिधी

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त येवता जिल्हा परिषद सर्कल मधील कोल्हेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व वस्ती शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य वाटपकरून लोकनेत्याची जयंती साजरी केली. भाजपाचे नेते श्री.विष्णू भाऊ घुले यांच्या संकल्पने तून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप कार्यक्रम आयोजित केला होता.याप्रसंगी कोल्हेवाडी येथील संरपच सौ.प्रेमला नंदकुमार मिसाळ,उप सरपंच श्रीराम खांडेकर, मा.सरपंच रामराव मिसाळ,मा.सरपंच बाबासाहेब मिसाळ,मेजर सतीश मिसाळ,अशोक खांडेकर,सुरेश आघाव, ग्रामपंचायत सदस्य सर्जेराव मिसाळ,सुरेश आंधळे,नंदकुमार मिसाळ मोहन खांडेकर,शंतनू डांगे,धनराज खांडेकर, रमेश कदम,रावण मिसाळ,सखाराम आंधळे, अशोक मिसाळ,मधुकर मिसाळ,आप्पासाहेब आंधळे,शरद खांडेकर, नरहरी खांडेकर,कृष्णा मिसाळ,आकाश मिसाळ, सुरेश जगताप,जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक चौरे सर, गरदडे सर,ढवळ शंकर सर,नेमाणे सर,मच्छिंद्र आंधळे व कोल्हेवाडी येथील प्रमुख कार्यकर्ते, भाजपा पदाधिकारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन यशस्वी!

# वेतन, ग्रॅच्युटी आणि पेन्शन लागू करण्या बाबत शासनाकडून सकारात्मक आश्वासन

दैनिक वादळ वार्ता

नंदुरबार । दिपक गोसावी

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी समन्वय समितीच्या नेतृत्वाखालील अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी नागपूर येथील यशवंत स्टेडियमवर आयोजित केलेले धरणे आंदोलन यशस्वी झाले आहे. सुमारे एक हजार अंगणवाडी कर्मचारी प्रतिनिधींनी यात सहभाग घेतला आणि शासनाचे लक्ष वेधले.

युवराज बैसाणे, संजय मापले, जयश्री वाबळे आणि रामकृष्ण बी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात, अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देणे, मानधनात भरीव वाढ करणे, ग्रॅच्युटी व पेन्शन लागू करणे आणि उन्हाळी सुट्टी वाढवण्याची मागणी केली होती.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, महिला व बालविकास विभागाचे उपसचिव विलास ठाकूर आणि कक्ष अधिकारी जाधव यांनी शिष्टमंडळाशी चर्चा केली. ही चर्चा अत्यंत सकारात्मक झाली.

सेवानिवृत्ती वेतन (पेन्शन), ग्रॅच्युटी आणि भरपगारी आजारपणाच्या रजेचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे.,गुजरात उच्च न्यायालयाच्या निकालानुसार अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना अनुक्रमे २४,८००/- आणि २०,४००/- वेतन लागू करण्याच्या कायदेशीर बाबी तपासून निश्चितपणे विचार केला जाईल.,प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांवर फेरविचार



करण्याचे आश्वासन देण्यात आले.,अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अद्ययावत मोबाईल आणि सिमकार्डसाठी निधी दिला जाईल. तसेच, एफ आर एस, पोषण ट्रॅकरच्या तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी प्रकल्प स्तरावर कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत.आमदार आमश्या पाडवी, रवी राणा आणि अमोल पाटील यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन मागण्यांना आपला पूर्ण पाठिंबा दर्शविला आणि त्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.चर्चेअंती मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन मिळाल्याने, समन्वय समितीने हे आंदोलन यशस्वी झाल्याचे घोषित केले.

संपादकीय

# प्रवासी ठकले!

दहा दिवस झाले, तरी देशात हवाई प्रवास क्षेत्रात झालेला घोळ संपायची चिन्हं दिसत नाहीत. 'आता निदान पंधरा दिवसांत तरी हा घोळ निस्तरा' असं काकुळतीने सांगण्याची वेळ केंद्र सरकारवरच आली आहे! 'इंडिगो' ही आज देशातील अग्रगण्य विमान कंपनी आहे. देशाच्या विमान वाहतूक क्षेत्राचा ६५ टक्के वाटा या कंपनीकडे आहे. टाटांकडे २७ टक्के वाटा आहे. उरलेल्या टक्क्यात अन्य तीन–चार कंपन्या आहेत. 'इंडिगो'ने आपल्या व्यवहार कुशलतेने हवाई वाहतूक क्षेत्रावर मक्तेदारी मिळवली हे ठीक; पण एवढं महत्त्वाचं स्थान मिळाल्यावर त्याबरोबर काही कर्तव्य आणि जबाबदाऱ्याही येतात याची जाणीव त्या कंपनीला नाही. जेव्हा देशाच्या एखाद्या क्षेत्राच्या ६५ टक्के वाट्यावर आपण अधिराज्य गाजवतो, तेव्हा एका अर्थाने देशातल्या त्या क्षेत्राची सर्वाधिक जबाबदारी आपल्या खांद्यावर आलेली असते; कर्तव्यात चुकलो, तर त्या देशाची प्रतिमा खराब होतेच. पण, ज्यांनी आपल्याला मुक्त संधी आणि प्रोत्साहन दिलं, त्यांनाही आपण जनतेसमोर उघडं पाडतो याचा विसर 'इंडिगो'च्या व्यवस्थापनाला पडलेला दिसतो. अनेक क्षेत्र सरकारने खासगी उद्योगांना मुक्त करून दिली असून त्यांचे व्यवहार हे आता पूर्णपणे 'बाजारा'वर; म्हणजेच स्पर्धेवर सोडून दिले आहेत. खासगी उद्योगांचं सेवा व्यवस्थापन, वित्त व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांबाबतचं धोरण यात सरकार फार हस्तक्षेप करू शकत नाही. त्यामुळेच 'इंडिगो'ने लाखो प्रवाशांचं जगणं वेठीला धरूनही सरकार त्यांच्यावर अद्याप काही कारवाई करू शकलेलं नाही. वाहतूक क्षेत्राची नियामक संस्था म्हणून देशात 'नागरी विमान वाहतूक महासंचालनालय' आहे. पण, हे महासंचालनालयच बेसावध राहिल्याने हा अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला असून आता कारवाई करायची तर आधी कोणावर करावी, असा प्रश्न सरकारला पडला आहे. 'इंडिगो'ने बेजबाबदारपणा केला आहेच. पण, विमान वाहतूक क्षेत्रातल्या कंपन्या आपल्या जबाबदाऱ्या नीट पार पाडताहेत की नाही, याची खातरजमा करण्यासाठी जी नियामक यंत्रणा आहे, तिनेच डोळेझाक केली असल्याने सरकारची पंचाईत झाली आहे. झालेला घोळ लवकर निस्तरला नाही आणि त्यातून राष्ट्रीय संपत्तीचं नुकसान झालं, या आरोपाखाली पंधरा दिवसांनंतर सरकारला कदाचित कारवाई करता येईल! कोणतंही वाहन संकेत आणि नियम न पाळता चालवणं धोक्याचंच असतं. विमान विशेष धोक्याचं. कारण, ते अधांतरी तीस–पस्तीस हजार फुटांवरून उडत असतं. अगदी शे–दोनशे फुटांवर त्यात काही अडचण, संकट आलं तरी मदत करता येणं अशक्य असतं. त्यामुळे, विमानाची देखभाल नेहमीच खूप काटेकोरपणे केली जाते. वैमानिकाचं प्रशिक्षण खूप खडतर असतं. त्यांना नियमांचं, मार्गदर्शक सूचनांचं खूप काळजीपूर्वक पालन करावं लागतं. आपली बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक तंदुरुस्ती सतत सिद्ध करावी लागते. विमान कंपनीसाठी, कंपनीच्या व्यवस्थापनासाठी, वाहतूक व्यवस्थापनासाठी– राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवर असंख्य तपशीलवार कडक नियम आहेत. त्यांची छाननी, फेरआखणी सातत्याने होत असते. विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये आता मध्यमवर्गीयांची संख्या वाढली असली, तरी आजही विमान प्रवाशांची प्रतिष्ठा ही अन्य कोणत्याही साधनांनी प्रवास करणाऱ्या प्रवाशांपेक्षा उच्च श्रेणीतलीच मानली जाते. त्यामुळे, जगभर त्यांची विशेष काळजी घेतली जाते. वैमानिक, हवाई सेवक आणि सेविकांच्या प्रशिक्षणाकडे, त्यांच्या वर्तणुकीकडे, मिळकतीकडे विशेष लक्ष दिलं जातं. भारतात गेल्या पंधरा वर्षांत तीन मोठे विमान अपघात झाले. त्यात शेकडो बळी गेले. यातल्या एका अपघातात 'वैमानिकाचा थकवा' हे कारण पुढे आल्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयात एक याचिका दाखल झाली. त्या याचिकेवर विचार करताना न्यायालयाने महासंचालनालयाला काही निर्देश दिले. त्यावरून वैमानिकांच्या विश्रांतीचे तास आठवड्याला ३६ वरून सलग ४८ केले गेले. रात्रपाळीच्या, दिवसाच्या कामाच्या तासांतही बदल झाले. या सगळ्या गोष्टींची अंमलबजावणी अनिवार्य होती. सरकारचे नवे नियम अमलात आणायचे, तर वैमानिकांची संख्या वाढवावी लागणार, हे उघड होतं. १८ महिन्यांपूर्वीच याबाबतची स्पष्टता येऊनही 'इंडिगो' गेलं दीड वर्ष काहीही न करता तशीच बसून राहिली. सरकारची कुठलीच गोष्ट गंभीरपणे घ्यायची नसते, या गैरसमजाचे ती शिकार झाली. 'सब चल जाता है' या राष्ट्रीय रोगाने तिचा घात केला. त्याची शिक्षा लाखो प्रवाशांना भोगावी लागली. सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं राहावं लागलं. 'इंडिगो' पाठोपाठ देशात या क्षेत्रात दुसऱ्या क्रमांकावर 'टाटां'ची 'एअर इंडिया' आहे. त्यांच्याकडे बरीच जुनी विमान असल्याने अनेक जायबंदी आहेत. अनेक विमानं दुरुस्ती–देखभालीसाठी जमिनीवरच उभी असतात. अन्य कंपन्या छोट्या असल्याने त्यांना आहेत त्या वैमानिकांमध्ये विमान सेवा चालवणं शक्य झालं. 'इंडिगो'ला ते शक्य नव्हतं. पण, आपली मक्तेदारी इतकी आहे, की आपलं कोण काय बिघडवणार? देशात गोंधळ उडाला, तर सरकारच अडचणीत येईल. ते आपोआप आपलेच नियम शिथिल करेल, याची खात्री त्यांना होती. झालंही तसंच. देशभर हाहाकार उडूनही या कंपनीच्या व्यवस्थापनाने सुरुवातीचे दोन–तीन दिवस त्याची अजिबात दखल घेतली नाही. प्रवाशांना ढिम्मपणे उलट उत्तरं देत होते. वर वाढत्या तिकीट दरांचा फायदा उपटण्याचा प्रयत्नही केला. सरकारने कान पकडेपर्यंत कंपनी पूर्ण बेफिकीर होती. आता ते कितीही आश्वासनं देत असले, तरीही त्या मुदतीत त्यांना परिस्थिती नियंत्रणात आणणं शक्य नाही. वैमानकांची भरती ही इतकी सहज प्रक्रिया नसते. सरकारने माघार घेतलीच आहे. यावरून धडा घेऊन सरकारनेच आता आपल्या एकूण हवाई प्रवासी धोरणाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. प्रवाशांचे हक्क त्यात केंद्रस्थानी असतील, असं पाहिलं तर या पुढच्या काळात असे घोळ होणार नाहीत आणि ते अपराधी भावाने निस्तरावेही लागणार नाहीत.

# विधिमंडळात विरोधी पक्षनेता नाही, उपमुख्यमंत्री पद असंविधानिक–ठाकरेंनी शिंदेंना पुन्हा एकदा डिवचलं

**दैनिक वादळ वार्ता । नागपूर । प्रतिनिधी**

हिवाळी अधिवेशनात कामकाजात सहभागी होण्यासाठी ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे विधिमंडळात दाखल झाले त्यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डिवचलं. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता हे संविधानिक पद आहे ते हे सरकार नियुक्त करत नाही तर उपमुख्यमंत्री हे पद संविधानिक नाही ते काढून टाकावे.अशी मागणी करीत एकनाथ शिंदे यांच्यावर टिका केली.या अधिवेशनात विरोधक सत्ताधाऱ्यांना वेगवेगळ्या मुद्द्यांवरून कोंडीत पकडत आहेत. लाडकी बहीण, बिबट्यांचा उच्छाद, शेतकरी कर्जमाफी याबाबत विरोधक सत्ताधाऱ्यांना जाब विचारत आहेत. कामकाजात सहभागी होण्यापुर्वी उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप केले. उपमुख्यमंत्री पदाला काही महत्त्व नाही, असे सांगत त्यांनी शिंदे यांच्यावर टिका केली. सध्या विधानसभेत विरोधी पक्षनेतेपद रिक्त आहे. विरोधकांनी या पदासाठी भास्कर जाधव यांचे नाव सुचवलेलं आहे. परंतु अद्याप त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. याच मुद्द्यावर ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना डिवचले. 'गेल्या वर्षी मी म्हटलं होतं की विरोधी पक्षनेते पदावर आम्ही दावा सांगितला होता. भास्कर जाधव यांचं नावही सूचवलं आहे. पण उत्तर आलं नाही,' असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. तसेच नियम असला काय नसला तरी दोन, दोन उपमुख्यमंत्री पदं तयार केली जातात. मग




विरोधी पक्षनेतेपद द्यायला घाबरता का? असा सवालही ठाकरेंनी केला.दोनशे पेक्षा जास्त जागा निवडून आल्याने तुमचे सरकार मजबूत आहे. तुमच्या सरकारला केंद्र सरकारचा आशिर्वाद आहे. तरीही विरोधी पक्षनेतेपद का दिले जात नाही. तुम्ही एवढे कशाला घाबरता, असा सवाल त्यांनी केला. विरोधी पक्षनेतेपद दिले जात नसेल तर मग असंवैधानिक असलेले उपमुख्यमंत्री पदही काढून टाका. त्या त्या खात्याच्या नावाने मंत्री ओळखला गेला पाहिजे, असे ठाकरे म्हणाले. भाजपाचे नेतेच सांगतात की नंबर एकलाच महत्त्व असतं. नंबर दोनचं महत्त्व नाही, असा टोलाही उद्धव ठाकरे यांनी लगावला. ठाकरे यांची ही टोलेबाजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठीच आहे अशी चर्चा विधानभवनात रंगली आहे.भाजपचे नेते अनेकदा उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस सोबत युती करून हिंदुत्व सोडल्याची टीका करतात. उद्धव ठाकरेंनी भगवा झेंडा सोडून दुसरा झेंडा हाती घेतला आहे असाही आरोप केला जातो.यावर उत्तर देताना भाजपचा एक मंत्री गोमांस खातो असं म्हणत अमित शाह त्यांच्या शेजारी बसून जेवण करतात असे ठाकरे यांनी सांगितलं.अमित शाह फार मोठे हिंदुत्ववादी आहे. त्यांचा एक फोटो कुणीतरी ट्वीट केला आहे. मला अमित शाह यांनी हिंदुत्व शिकवण्याची गरज नाही. भाजपनेही नाही आणि संघाने तर अजिबात नाही. तुमच्या मंत्रिमंडळात गोमांस खाणारे मंत्री आहेत. मी गोमांस खातो. कोण मला आडवतो बघतो असे ते मंत्री म्हणतात. तो फोटो आहे, ९ डिसेंबरचा आहे. त्यांचं नाव किरण रिजिजू. त्यांच्या सोबत शाह जेवत आहे. त्यांच्या आणि यांच्या थाळीत काय असेल माहीत नाही. अमित शाह यांना माझ्या हिंदुत्वावर शंका घ्यायची असेल तर पहिलं रिजीजू यांना मंत्रिमंडळातून काढलं पाहिजे असे ठाकरे म्हणाले.

**उद्धव ठाकरे यांच्या टिकेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले मुख्यमंत्री पदासाठी ठाकरेंनी स्वतःचे पायपुसणं करून घेतले अशी टिका केली. ठाकरेंच्या हिंदुत्वावरील नैतिक अधिकारावर शंका उपस्थित करत. मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जी.आर. स्वामीनाथन यांच्या विरुद्धच्या महाभियोग प्रस्तावावर उद्धव ठाकरेंनी सही केल्याचा दाखला देत, शिंदे यांनी ठाकरेंना हिंदुत्वावर बोलण्याचा अधिकार नसल्याचे म्हटले. ठाकरे जिंकल्यावर यंत्रणा चांगल्या असतात, तर हरल्यावर त्यांना त्या वाईट ठरतात. ईव्हीएम, मतदार यादी, निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय या सर्वांवर ठाकरे आक्षेप घेतात असे शिंदे महणाले. शेतकरी मदतीच्या मुद्द्यावर बोलताना, १४ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याची आकडेवारी त्यांनी सादर केली आणि ठाकरेंनी याबाबत केलेला खोटारडेपणा आता लपून राहिलेला नाही असे शिंदे यांनी म्हटले.**

# डॉ.बाबा आढाव : हमाल कष्टकऱ्यांचा बुलंद आवाज

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांचे आठ डिसेंबर रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी पुण्यात निधन झाले. त्यांच्या निधनाने राज्यभरातील हमाल, मापाडी, कष्टकरी, कामगार, शेतमजूरांसह असंघटीत क्षेत्रातील सर्व कामगार गोरगरीब हळहळले. बाबांच्या निधनाची वार्ता कळताच असंख्य कार्यकर्ते धायमोकलून रडले. डॉ. बाबा आढाव हे नाव महाराष्ट्रासह देशालाही सुपरिचित होते. कष्टकरी गोरगरीबांचा बुलंद आवाज म्हणून त्यांची ओळख होती. बाबांनी तहहयात तमाम कष्टकरी गोरगरीबांच्या आयुष्यात गरिबीवर मात करण्याचा आत्मविश्वास निर्माण केला. जातीभेद, धर्मभेद, पंथभेद मानू नका माणूस तिथून एक आहे, अशी आदर्शवत शिकवण त्यांनी दिली. कष्टाची आणि गरिबीची लाज वाटू देऊ नका, मेहनतीची हक्काची भाकरी खा, वादळाचा मुकाबला करायला शिका, प्रवाहाच्या विरोधात पोहायला शिका, आपल्या मुलाबाळांना शाळेत घाला. त्यांना नोकऱ्या करू द्या, त्यांना हमाल बनवू नका. असा जीवन जगण्याचा संदेश देणारे डॉ. बाबा हे खरेच गोरगरीबांच्या आयुष्यात आदर्शवत होते. पद, पैसा खुर्ची, स्वार्थ बाजूला सारून केवळ कष्टकऱ्यांवरील अन्यायाविरोधात त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी झपाटलेला हा माणूस होता. फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचार आणि कार्याचा वसा अंगीकारलेला हा माणूस होता. सामाजिक समतेचा संगर असलेल्या नामांतर लढ्यात स्वतःला झोकून देऊन, पुणे ते औरंगाबाद असा लाँग मार्च बाबांनी काढला. पुणे नगरपरिषदेत गोरगरीबांच्या हिताचे बजेट नाही, म्हणून नगरसेवक पदाचा राजीनामा देणारे डॉ. बाबा आढाव हे गोरगरीबांच्या किती बाजूचे होते, याचे हे एकमेवद्वितीय उदाहरण आहे. देशभरातील कोणत्याही राज्यात अस्तित्वात नसलेला, अंगमेहनती करणाऱ्या हमाल कष्टकऱ्यांसाठीचा कायदा राज्यात विविध आंदोलने करून, वेळप्रसंगी अनेकदा

जेलमधे जाऊन राज्य सरकारला हादरवून सोडून शेवटी हमाल मापाडी कायदा राज्यसरकारला करायला भाग पाडणारे बाबा हे नाव शासनकर्त्यांना आज ही घाम फोडतेय. अन्याय, अत्याचार, विषमता, असमानता, दारिद्र्य, अशिक्षितपणा ही समाजाला लागलेली कीड आहे, आणि ती आपण सर्वांनी मिळून नष्ट केली पाहीजे, या ध्येयाने प्रेरित होऊन ते तहहयात निडरपणे लढत राहीले. हमाल पंचायत ची स्थापना करून त्यांनी तमाम गोरगरीब कष्टकऱ्यांना



आपले हक्क आणि आधिकारासाठी एकजूट होऊन लढायला शिकवले. राज्यात हमाल मापाडी महामंडळाची त्यांनी स्थापणा केली. नागपूर, पुणे, मुंबई, छ. संभाजीनगर, बीड, लातूर, नांदेड, धाराशिव, सोलापूर ई. जिल्ह्यात आपले खंबीर सहकारी साथी सुभाष लोमटे व राज्यभरातील इतरही साथींसोबत ते गोरगरीबांच्या हितासाठी लढत राहीले. कष्टकऱ्यांना कमी पैशात पौष्टिक आहार म्हणून त्यांनी कष्टाची भाकर योजना सुरू केली. आज ती पन्नास वर्षांनंतर ही राज्यभरात आदर्शवत सुरूच आहे. एक गाव एक पाणवठा ही चळवळ सुरू करून जातीभेदाला मूठमाती द्या, सामाजिक समानता प्रस्थापित करा, असे सांगत राज्य पिंजून काढले. माणूस जोडण्याचे काम बाबांनी केले. समता प्रतिष्ठानची स्थापना करून विविध सामाजिक सौहार्दाची कृती केली.

स्त्री–पूरूष असा भेद त्यांनी कधी केला नाही. वयोवृद्ध कष्टकऱ्यांचा नेहमीच त्यांनी सन्मान केला. पुरोगामी सत्यशोधक हे त्रैमासिक काढून त्यांनी गोरगरीब कष्टकऱ्यांना आपल्या हक्काची आणि आधिकाराची जाणीव करून दिली. रक्ताचं नातं, असंघटीत कामगार : काल आज आणि उद्या अशी विविध विषयांवरील डझनभर पुस्तके लिहून बाबांनी लिहीणे, वाचणे, लढणे, प्रवास, बैठका, परिषदा, संवाद, चर्चा, गोष्टी, आंदोलने हा जीवंत जीवनप्रवाह गोरगरीबांना शिकवला. आभाळाची आम्ही लेकरे... सत्य सुखाला आधार बाकी सर्व अंधकार. या महात्मा ज्योतीबा फुलेंच्या अभंगाने ते कार्यक्रमाची सुरूवात करीत असत. बाबा तहहयात संविधानीक मूल्यांची जपणूक करीत राहीले. त्यांचे आचरण, विचार , कृती सर्वकाही संविधानिक मूल्ये मजबूत करणारीच तर होती. संविधानावरील विश्वास दृढ करणारी होती. राज्यभरातील हमाल, मापाडी, गोरगरीब, कष्टकऱ्यांना त्यांनी माणुस बनवले. त्यांना माणूसपणाचा चेहरा प्राप्त करून दिला. त्यांच्यात नवचैतन्यासह सच्चाई, प्रामाणिकपणा, अच्छाई भरली आणि त्यांना एक नवी ओळख दिली. मोलकरीण असो, रिक्षाचालक, टपरीधारक, रस्त्यावर फिरणारे, हातगाडीवाले, फेरीवाले असे सर्व गोरगरीब बाबांना ओळखत असत. त्यांना आपला हक्काचा लढवय्या मानत असत. बाबांमुळे गोरगरीबांच्या जीवात जीव रहात असे. एक आधारवड म्हणून ते सर्वजण बाबांकडे बघत. बाबांमधील सद्गुण, समर्पण वृत्ती, समजून घेणे, सांभाळून घेणे, साधेपणा, आपलेपण, सरळ स्वभाव, संविधानिक विचार आणि कृती या गुणांमुळे ते गोरगरीबांचे बाबा झाले. पुण्यभूषण पुरस्कार, मॅन ऑफ द ईयर, सोशल इम्पॅक्ट जीवन गौरव पुरस्कार ई. असे अनेक सन्माननीय पुरस्कार मिळून देखील बाबा कधी त्या पुरस्काराच्या ओझ्याखाली दबलेले दिसले नाहीत. चांगल्या कार्याची पावती म्हणून ते पुढे आणखी जोमाने कार्य करीत राहीले, अगदी तहहयात. गोरगरीबांच्या सर्वांगीण उत्थानासाठी त्यांनी आपलं संपूर्ण जीवन समर्पित केले ते ही माणसाला आणि शेवटी.... निसर्गालाही. अशा आमच्या डॉ. बाबा आढाव या लढवय्या नेत्याला राज्यभरातील सर्व हमाल, मापाडी, गोरगरीब, कामगार, शेतमजूर, शेतकरी, कष्टकऱ्यांकडून विनम्र अभिवादन.

**ॲड. सुभाष सावंगीकर**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो. ९३२५२०९४९२**

# अन्यथा सरकारने आम्हांला फाशी दयावी वा गोळ्या घालाव्यात–पिडितांची मागणी

**दैनिक वादळ वार्ता । मुंबई । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील महापालिकांना पादचाऱ्यांची सुरक्षा अंतर्गत नियमावलीचे निर्देश दिले आहेत. राज्य शासनाच्या निर्देशानुसार, मुंबई महानगरपालिकेने संपूर्ण मुंबईत रस्त्याशेजारी आणि उघड्यावर राहणाऱ्या श्रमिक बेघर नागरिकांचे मोठ्या प्रमाणात निष्कासन कारवाई चालू केली आहे. त्याचबरोबर मुंबई पोलिसांनी सुद्धा रस्त्यावर राहणाऱ्या श्रमिकांना मुंबई भिक्षेकरी प्रतिबंध कायद्याअंतर्गत अटक करून भिकारी बनवले आहे.

दि. २ डिसें.२५ रोजी चिकूवाडी बोरिवली पश्चिम येथील मुंबई महापालिकेच्या नालेसफाईची कामे करून आत्मसन्मानाने जगणाऱ्या ५५ पारधी समाजातील कुटुंबांच्या झोपड्यांवर अतिशय निर्दयतेने कारवाई करीत थंडीच्या दिवसांमध्ये या पारध्यांना बेघर केले. एकीकडे महाराष्ट्र शासन, शासन निर्णयान्वये थंडीच्या दिवसात रस्त्यावर राहणाऱ्या बेघरांची काळजी घेण्याबाबत महापालिकेंना निर्देश देते. मात्र दुसरीकडे मुंबई महापालिका या शासन निर्णयाविरोधात जाऊन थंडीच्या दिवसात उघड्यावर, रस्त्याच्या शेजारी आणि नाल्या शेजारी राहणाऱ्या भटके विमुक्त समाजातील पारधी कुटुंबियांच्या झोपड्यांची तोडमोड करीत आहे. मुंबई महापालिका आर सेंट्रल विभागाच्या तोडक कारवाईमुळे बोरिवली चिकूवाडी नाल्याच्या शेजारी राहणाऱ्या पारधी समुदायातील २५ शाळेत जाणाऱ्या मुलांचे सुद्धा नुकसान झाले आहे. ते शाळेत जाऊ शकत नाहीत. या तोडक कारवाईमुळे हे भयभीत झालेला पारधी श्रमिक रोजगाराला सुद्धा जाऊ शकत नाही आणि थंडीच्या दिवसात आसऱ्यासाठी आपली मुलं – वयस्कर आई बापांसोबत वणवण भटकत आहे. यात तोडक कारवाईमुळे कॅन्सर पीडित जेष्ठ नागरिक, ७ दिवसाची, १ महिन्याची आजारी मुलं आणि अनेक वयस्कर नागरिकांची दैना झाली आहे. चिकूवाडीतील पारधी श्रमिक मुंबईतील नालेसफाई चे काम, रस्ता सफाई, अगदी गणेशोत्सवाच्या काळात कृत्रिम तलाव बनवण्याचे काम करून महापालिकेला एक प्रकारचे सहकार्य देत आलेले आहेत.त्याबरोबर, दत्तानी पार्क बस स्टॉप शेजारी,कांदिवली पूर्व या ठिकाणी मागील १५ वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या पारधी कुटुंबांना गेल्या वर्षभरापासून येथील महापालिका आणि पोलीस अधिकारी बसू देत नाही, त्यांचे जेवणाचे, चुलीचे सामान लाथेने फेकले जाते. बोरीवली येथील डॉन बॉस्को शाळेसमोरील तसेच बोरिवली एमटीएनएल ऑफिस समोरील श्रमिक बेघरांना, तसेच विलेपार्ले स्टेशन जवळील राहणाऱ्या श्रमिकांना अटक करण्याचे धमकावून भयभीत केले जात आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पादचारी सुरक्षेसाठी मुंबई पोलीसानी दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी दत्तानी पार्क कांदिवली हायवे शेजारी राहणाऱ्या पाच श्रमिक पारध्यांना रोजगाराचे आमिष दाखवत पोलिस स्थानकात घेऊन गेले आणि मुंबई भिक्षेकरी कायद्याअंतर्गत भिकारी म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. त्यांना अटक करून न्यायालयात नेल्यावर तिथे त्यांना प्रत्येकी २१०० रुपयांचा दंड आकारून गुन्हेगार – भिकारी म्हणून त्यांची नोंद करण्यात आली आणि या प्रमाणिक श्रमिकांच्या आत्मसन्मानाला ठोकर मारली आहे. . मुंबई महापालिकेच्या तोडक कारवाई आणि पोलिसांच्या अमानवी छळाच्या दहशतीतील पीडित गीता काळे यांनी आम्ही या देशाचे नागरिक नाही का? पारधी म्हणून आम्हाला काय जगण्याचा अधिकार देणार आहात की नाही? आम्हाला गोळ्या घाला नाही तर लटकावा असे उदवेगपणे सांगितले.विलेपार्ले येथील सुनिता यांनी सांगितले की कुत्र्या मांजराचे जगण्यापेक्षा सरकारने आम्हाला गोळ्या घालून ठार मारावेत.आम्ही भीक मागत नाही तर आम्ही श्रम करतोय, आम्हाला आमचे अधिकार पाहिजेत. आम्हाला सोई सुविधा आणि घराचा अधिकार सुद्धा पाहिजे. घराचे पैसे द्यायला लागले तरी पण आम्ही मेहनत करून द्यायला तयार आहोत. बोरिवली एमटीएनएल ऑफिस समोर राहणाऱ्या आशा दुबे यांनी सांगितले की,नववी दहावीत माझी शिकणारे मुलं आज पोलिसांच्या आणि बीएमसीच्या भीतीमुळे शाळेत जात नाहीत.माझी पुरी जिंदगी रस्त्यावरती गेली पण मला माझ्या मुलांची जिंदगी रस्त्यावर घालवायची नाही तर त्यांना शिक्षण द्यायचं आहे. सरकारने शिक्षणाचा अधिकार तरी नाकारू नये अशी विनंती केली. मुंबई भिक्षेकरी कायद्यान्वये अटक केलेल्या दिलीप काळे याने सांगितले की पोलीस स्टेशन मध्ये काम असे सांगून नेले मात्र आम्हाला अटक करून भिकारी बनवले.रोजगार तर मिळाला नाही उलट २१०० रुपयांचा दंड सुद्धा भरून भिकारी म्हणून भिक्षेकरी गृहात एक दिवस राहावं लागल्याची खंत बोलून दाखवले. मानव अधिकार चवळीतील कार्यकर्ते एडवोकेट रहिमत यांनी त्यांचा अनुभव सांगताना सांगितले की भिक्षे करू कायद्याचा बळी हा नेहमीच पारधी समाजातील लोकांचा होत आला आहे पारधी समुदायासाठी रेणके आयोग इदा त्या आयोगाने सुचवलेल्या शिफारशी जर शासनाने लागू केल्या तर रस्त्यावरती एकही पारधी दिसू शकणार नाही असे सांगितल.पाणी हक्क समितीचे समन्वयक जगदीश पाटणकर यांनी सरकार एका बाजूला रस्त्यावरच्या उघड्या उघड्यावर रस्त्यावरील लोकांच्या थंडीपासून संरक्षणासाठी जीआर काढते तीच मुंबई महानगरपालिका थंडीच्या दिवसात श्रमिकांना वाऱ्यावर सोडते. हा शासनाचा भटके विमुक्तसोबत दुजाभाव असल्याचे सांगतात.

आजच्या पत्रकार परिषदेमध्ये मुंबईतील पारधी समुदायावर होत असलेल्या अत्याचारा संदर्भात माध्यमासमोर येऊन लोकांनी आपल्या व्यथा मांडल्या त्याचबरोबर खालील मागण्या सुद्धा मांडण्यात आल्या

१.थंडीच्या दिवसात महापालिकेद्वारे होणारे तोडमोड कारवाई त्वरित थांबवण्यात यावी.

२.मुंबई पोलिसांद्वारा भिक्षेकरी कायद्यांतर्गत रस्त्यावरील श्रमिकांची होत असलेली अटक ताबडतोब थांबविण्यात यावी.

३.या अत्याचारी कारवाईत सामील सर्व मुंबई पोलिस आणि मुंबई मनपा अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

४.माननीय प्रधानमंत्री यांच्या स्वप्नातील योजने नुसार बेघरांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ३ किलोमीटरच्या परिघात या सर्व कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात यावे.

५.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, श्रमिक बेघरांसाठी कौटुंबिक निवारा अथवा प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आवासाची व्यवस्था होत नाही तोपर्यंत त्यांना त्याच ठिकाणी वास्तव्यास मुभा द्यावी आणि महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार मूलभूत सुविधा आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा.

# नंदुरबार तालुका विधायक समितीचे संस्थापक, थोर शिक्षण महर्षी स्व.गो.स.मराठे यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

## ‘गिरीजन’ ते शिक्षण संकुलाचा वटवृक्ष: दादांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य प्रेरणादायी!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार तालुका विधायक समिती (एनटीव्हीएस) या अग्रगण्य शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व.गोविंदराव सखाराम मराठे यांच्या ३० व्या पुण्यतिथीनिमित्त संस्थेच्या सर्व शाखांवर दिनांक १२ डिसेंबर रोजी अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी त्यांच्या महान कार्याचे स्मरण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नंदुरबार शहरातील संस्थेच्या मुख्य शाखेत, यशवंत विद्यालयात, हा मुख्य कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी संस्थेचे सचिव यशवंत देवराम पाटील, प्राचार्य पुष्पेंद्र रघुवंशी, तसेच स्व. गो. स. मराठे यांचे नातू अमित मराठे आणि कन्या मराठे उपस्थित होते. विद्यालयातील व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभाग घेतला.




कार्यक्रमादरम्यान प्राचार्य पुष्पेंद्र रघुवंशी यांनी स्व. गो. स. मराठे यांच्या सामाजिक कार्यावर आणि संस्थेसाठी त्यांनी घेतलेल्या अपार परिश्रमांवर मनोगत व्यक्त केले.

आजची युवा पिढी स्व. गो. स. दादांच्या कार्यापासून खूप काही शिकू शकते. शिक्षण आणि समाजसेवा हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होते, असे प्राचार्य रघुवंशी म्हणाले.

दादांच्या कार्याचा प्रवास:-१९५५ साली त्यांनी नंदुरबार शहरात आदिवासी आणि गरीब जनतेच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी पहिले साप्ताहिक वर्तमानपत्र ‘गिरीजन’ सुरू केले.,ग्रामीण भागातील जनतेत शिक्षणाचा अभाव व गरिबी पाहून त्यांनी केवळ पत्रकारितेवर न थांबता, ३० नोव्हेंबर १९६२ रोजी ‘नंदुरबार तालुका विधायक समिती’ची स्थापना केली आणि आदिवासी, दलित व गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी पहिले वसतिगृह सुरू केले., संस्था स्थापनेच्या काळात त्यांना स्व. गजमल तुळशीराम पाटील, स्व. चंद्रसिंग राजपूत तसेच स्व. बटेसिंहजी रघुवंशी यांसारख्या सहकाऱ्यांची मोलाची साथ मिळाली. स्व. बटेसिंहजी रघुवंशी यांनी राजकारणातील आपल्या सक्रियतेमुळे संस्थेसाठी आश्रमशाळा, वरिष्ठ महाविद्यालय आणि विधी महाविद्यालये शासनाकडून मंजूर करून आणली, ज्यामुळे संस्थेच्या प्रगतीला मोठी गती मिळाली.

स्व. गो. स. मराठे यांनी लावलेल्या या छोट्या रोपट्याचे आज शैक्षणिक वटवृक्षात रूपांतर झाले आहे. मधुमेह सारख्या आजाराने प्रकृती खालावलेली असतानाही, १२ डिसेंबर १९९५ रोजी निधन होईपर्यंत त्यांनी संस्थेचे कामकाज, प्रशासकीय देखरेख आणि अध्यक्षपदाचा कार्यभार समर्थपणे सांभाळला.

# मुंबई विद्यापीठाला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव द्यावे-सुजाता पोहरे यांचे सरकारला निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**नागपूर । प्रतिनिधी**

देशातील विविध राज्यां मध्ये व विद्यापीठांना महापुरुषांची नावे देऊन त्यांच्या विचारांचा वारसा जपला जात असताना, महाराष्ट्राची शैक्षणिक राजधानी मानल्या जाणाऱ्या मुंबई विद्यापीठाला लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे,अशी ठाम आणि सशक्तमागणी अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सच्या ज्येष्ठ नेत्या सुजाता पोहरे यांनी सरकारकडे केली आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक,सामाजिक व लोकशाही मूल्यांना दिशा देणाऱ्या कार्याची दखल घेत,त्यांच्या नावाने विद्यापीठ नामकरण होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नागपूर येथे पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमी वर सुजाता पोहरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे,परिवहन मंत्री प्रताप



सरनाईक तसेच वित्त व नियोजन,कृषी मदत व पुनर्वसन,विधी व न्याय आणि कामगार मंत्री आशिष जयस्वाल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले.मुंबई विद्यापीठास लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे,अशी स्पष्ट मागणी यानिवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,अण्णा भाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते,तर शोषित-वंचित समाजाच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढणारे लोकशाहीर होते. त्यांच्या कथा,कादंबऱ्या, पोवाडे आणि लोककले तून सामाजिक समतेचा, मानवतेचा आणि संघर्षाचा संदेश त्यांनी समाजापर्यंत पोहोचवला. अशा महापुरुषाच्या नावाने देशातील अग्रगण्य विद्यापीठाचे नामकरण झाल्यास नव्या पिढीला त्यांच्या विचारांची प्रेरणा मिळेल आणि महाराष्ट्राची सामाजिक-सांस्कृतिक ओळख अधिक ठळक होईल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

या वेळी सुजाता पोहरे यांच्यासोबत शिष्टमंडळात मास्तर नितेश कराळे,दत्ता पाटील खानसोळे,अनिल इंगोले देशमुख,सोपान नकुले शेलवाडीकर, नारायण गोटमुकले भेंडेगावकर तसेच अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्स चे संस्थापक बा.रा. वाघमारे यांचा समावेश होता.शिष्टमंडळाने सरकारकडे ही मागणी केवळ भावनिक नव्हे तर ऐतिहासिक न्यायाची बाब असल्याचे ठासून सांगितले.सरकारने या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा,अशीअपेक्षा व्यक्त करत सुजाता पोहरे यांनी सांगितले की,अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने मुंबई विद्यापीठाचे नामकरण झाल्यास ते महाराष्ट्राच्या सामाजिक न्यायाच्या परंपरेला साजेसे ठरेल.या मागणी ला राज्यभरातून पाठिंबा मिळत असून,लवकरच यावर ठोस निर्णय होईल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# १९ वर्षीय शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालय केज मुलींचा संघ राज्यस्तरा साठी पात्र

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने राजेसंभाजी सैनिकी स्कूल कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर येथे शालेय बेसबॉल स्पर्धा १९ वर्ष वयोगट विभागीय स्पर्धा दिनांक १४ डिसेंबर २०२५रोजी संपन्न झाल्या यात बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी विद्यालयाचा १९ वर्ष मुलांचा व मुलींचासंघ जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत सहभागी झालेला होता या स्पर्धेत मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी पालघर येथे होणाऱ्या राज्यस्तर स्पर्धे साठी पात्र झाला आहे. तसेच मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.या संघास क्रीडा मार्गदर्शिका तथा प्राचार्य डॉक्टर कविता गीते मॅडम,क्रीडा शिक्षक सानप सर,कांदे मॅडम,



घुले सर,साखरे सर यांचे मार्गदर्शन लाभले होते. तसेच माजी विद्यार्थी केशव कराड व सीनियर खेळाडू कृष्णा गिते या विद्यार्थ्यांनी नियमित सराव घेऊन विद्यार्थ्यांना राज्यस्तरांपर्यंत पोहोचण्यास मदतकेलेली आहे.या विद्यार्थ्यांचे बीड जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर, दिनकर थोरात सर, रेवन्नाथ शेलार सर,सतीश राठोड सर,अनिकेत काळे सर,होसुरकर सर,संस्था अध्यक्ष ड.उद्धवराव कराड साहेब,कापसे सर सर्व शिक्षक इतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# माळशेज रेल्वे मार्गाला तातडीची मंजूरी द्या खा.नीलेश लंके यांचे रेल्वे मंत्र्यांना साकडे

दैनिक वादळ वार्ता

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

माळशेज घाट-कल्याण (२४६ किमी) हा अत्यंत महत्त्वाचा नवीन रेल्वे मार्ग महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि नाशिक या तीन प्रमुख विभागांना थेट जोडणारा ठरणार असून, राज्याच्या औद्योगिक व भौगोलिक विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. या प्रकल्पाला तात्काळ अंतिम मंजूरी व आर्थिक तरतूद करावी, अशी ठाम मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रकल्प प्रलंबित असल्याने प्रस्तावित लॉजिस्टिक्स कॉरिडॉरला मोठा फटका बसत आहे. सध्या मुंबई-नाशिक-मनमाड आणि पुणे-दौंड-अहिल्यानगर या मार्गांवर प्रचंड भार पडला असून, यामुळे मालवाहतूक खर्च वाढत आहे. परिणामी, उद्योगधंदे व गुंतवणूकदारांवरही प्रतिकूल परिणाम होत असल्याचे लंके यांनी पत्रात नमूद केले आहे.मुंबई महानगर प्रदेश ते अहिल्यानगर-मराठवाडा- विदर्भ या भागांना जोडणारा सक्षम पर्यायी रेल्वे मार्ग सध्या उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत अहिल्यानगर-माळशेज घाट-कल्याण हा मार्ग भारतीय रेल्वेसाठी तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य, आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून उपयुक्त असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे.ना या रेल्वे मार्गामुळे छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर-मुंबई-मराठवाडा-विदर्भ या पट्ट्यात वाहतूक सुलभ होईल.दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी पूरक रेल्वे मार्ग उपलब्ध होईल. बंदरांशी निगडित मालवाहतुकीचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होईल. कृषी, निर्यात, एमएसएमई, पर्यटन आणि औद्योगिक क्षेत्राला चालना मिळेल. अहिल्यानगर-कल्याण तसेच कोकण प्रदेशाशी संपर्क अधिक गतिमान होईल.या प्रकल्पासाठी आवश्यक सर्वेक्षण, व्यवहार्यता अभ्यास व तांत्रिक चाचण्या मोठ्या प्रमाणात पूर्ण झाल्या आहेत. मात्र, अंतिम प्रशासकीय मंजूरी आणि निधी वाटपाचा टप्पा अद्याप प्रलंबित आहे. महाराष्ट्र सरकार, उद्योग विभाग, एमआयडीसी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनीही सातत्याने या प्रकल्पाच्या जलद अंमलबजावणीची मागणी केली आहे. लंके यांनी २०२४ च्या संसद अधिवेशनातही हा मुद्दा उपस्थित केला होता. राज्य व देशाच्या सर्वांगीण विकासासाठी हा प्रकल्प अत्यावश्यक असून, केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा खासदार लंके यांनी व्यक्त केली आहे. हा मार्ग मंजूर झाल्यास अहिल्यानगरसह संपूर्ण मध्य महाराष्ट्राच्या विकासाचा नवा अध्याय सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**रेल्वे मंत्र्यांकडे पाच ठोस मागण्या**

खासदार नीलेश लंके यांनी मंत्र्यांकडे केलेल्या मागण्यांमध्ये अहिल्यानगर-माळशेज घाट-कल्याण या नवीन रेल्वे मार्गाला तात्काळ अंतिम मंजुरी द्यावी, २०२५-२६ या आर्थिक वर्षात निधी वाटपाचा पहिला टप्पा त्वरित जाहीर करावा,माळशेज घाट बोगदा प्रकल्पाच्या डीपीआरला तांत्रिक समितीची मंजूरी देऊन अंतिम मान्यता द्यावी, या मार्गाचा ‘विशेष रेल्वे प्रकल्प श्रेणी’मध्ये समावेश करावा. यांचा समावेश आहे.



# जिल्ह्यात ‘कचरामुक्त गाव’ अभियानाला मिळणार गती

## घनकचरा व्यवस्थापनासाठी बचत गटाच्या महिला करणार जनजागृती-मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी

दैनिक वादळ वार्ता

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी आता महिला बचत गटांची मदत घेतली जाणार आहे. कुटुंब स्तरावरच ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी जिल्ह्यातील बचतगटांच्या माध्यमातून मोठी जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.जिल्ह्यातील अहिल्यानगर, शिर्डी देवस्थान, राहाता व संगमनेर शहरालगतच्या मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये कचऱ्याची समस्या गंभीर होत आहे. रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे आरोग्याची समस्या निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या वतीने संबंधित गावांमध्ये बचत गटातील




महिलांच्या बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकांमध्ये ओला व सुका कचरा म्हणजे काय आणि त्याचे वर्गीकरण कसे करावे, याबाबत तज्ज्ञ सल्लागारांमार्फत महिलांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.प्रशिक्षणानंतर या महिलांना गावातील काही कुटुंबे वाटून दिली जातील. संबंधित कुटुंबांनी कचऱ्याचे वर्गीकरण कसे करावे, याबाबत महिलांमार्फत प्रबोधन केले जाईल. सुरुवातीच्या टप्प्यात निवडक गावांचे कचरा व्यवस्थापन करून ती गावे कचरामुक्त करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.गावांतर्गत सांडपाण्याचे नियोजन करण्यासाठी वैयक्तिक शोषखड्डे किंवा गटारीद्वारे प्रक्रिया केंद्रापर्यंत पाणी नेले जाईल. मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये सांडपाण्यावर ’टायगर बायो फिल्टर’ (Tiger Bio Filter) तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करून ते पाणी वृक्षलागवड व शेतीसाठी पुनर्वापर करण्याबाबत प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच, प्लास्टिक मुक्तीसाठी ग्रामपंचायतीमार्फत ठराव घेणे, दंड वसूल करणे आणि प्लास्टिक संकलन केंद्रात कचरा जमा करणे, यासाठीही बचत गटांचे सहकार्य घेण्यात येत आहे.या अभियानात ग्रामसंघ, बचत गट, सीआरपी, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य सहभागी होऊन चारही क्लस्टरमध्ये बैठकांचे आयोजन करत आहेत. कचरा व्यवस्थापनासाठी गावोगावी लोकचळवळ उभी राहावी आणि आपले गाव स्वच्छ व सुंदर करण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले यांनी केले आहे.

# रणसिंग महाविद्यालयाच्या हरीश डोंबाळेची राष्ट्रीय स्तरावर झेप सायकलिंग स्पर्धेत सुवर्णपदक

दैनिक वादळ वार्ता

**इंदापूर । प्रतिनिधी**

कळंब ता.इंदापूर येथील इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे विश्वासराव रणसिंग महाविद्यालयात प्रथम वर्ष कला शाखेत शिक्षण घेत असलेला न्हावी ता. इंदापूर येथील हरीश दिपक डोंबाळे यांनी राष्ट्रीय स्तरावर झेप घेत सायकलिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले आहे. न्हावी गावचा ’हरहुन्नरी’ खेळाडू, ज्याने १०० किलोमीटर सायकलिंग स्पर्धेत महाराष्ट्राचे नाव उज्वल केले.खडतर परिश्रमाने १०० किलोमीटर मास्टर्स सायकलिंग स्पर्धेत संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक सुवर्ण पदक मिळवणारे खेळाडू हरीश दीपक डोंबाळे यांना प्रतिकूलतेवर मात करून यश संपादन केल्याने ग्रामीण भागातील अनेक तरुणांसाठी त्यांची संघर्षगाथा प्रेरणास्रोत आहे. त्यांचे वडील दीपक डोंबाळे यांचा वारसा घेऊन, हरीश एका लहानशा वस्तीवर राहूनही आपली स्वप्ने मोठी ठेवुन यश प्राप्त केले.हरीश ने सायकलिंग स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान चे सचिव विरसिंह रणसिंग यांनी अभिनंदन व्यक्त करीत संस्थेच्या विश्वासराव रणसिंग महाविद्यालयात शैक्षणिक गुणवत्ता



जोपासत असून जिल्हा व राष्ट्रीय स्तरावर विविध खेळात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे संस्था व महाविद्यालय सोबत असल्याचे सांगितले.हरीश डोंबाळे यांचे इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष आनंदी रणसिंग,उपाध्यक्ष प्रकाश कदम,सचिव वीरसिंह रणसिंग, खजिनदार विरबाला पाटील,विश्वस्त शंकरराव रणसिंग,विश्वस्त कुलदीप हेगडे,विश्वस्त राही रणसिंग,विश्वासराव रणसिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळंगे,उपप्राचार्य ज्ञानेश्वर गुळीग, उपप्राचार्य डॉ. प्रशांत शिंदे , क्रिडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सुहास भैरट,माध्यमिक विद्यालय तावशीचे मुख्याध्यापक महादेव बागल,माध्यमिक विद्यालय म्हसोबाचीवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद भोंग यांनी अभिनंदन केले.

# कुस्ती,पशु व कृषी स्पर्धांच्या बक्षिसात भरीव वाढ-आ.प्रतापराव पाटील चिखलीकर

## कलावंतांचा सन्मान करण्यात येणार;यात्रेत स्वच्छतेवर भर

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

दक्षिण भारतातील ग्रामीण भागात भरणाऱ्या मोठ्या यात्रांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र माळेगाव येथील श्री खंडोबा यात्रेचे वैभव अधिक वाढविण्यासाठी यावर्षी कुस्ती, कृषी व पशु स्पर्धांच्या बक्षीस रकमेत भरीव वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली. माळेगाव येथे आज आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली यात्रेच्या पूर्वतयारीसंदर्भात आढावा बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव, उपविभागीय अधिकारी नरवटे, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, यात्रा सचिव डी.बी. गिरी, अभियंता राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडीले, जिल्हा कृषी अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, गटविकास अधिकारी कुलकर्णी आदी उपस्थित होते.यंदा कुस्ती, कृषी आणि पशुसंवर्धन विभागाच्या स्पर्धांसाठी जवळपास ५० लाख रुपयांची वाढीव



तरतूद करण्यात आली आहे. कृषी विभागाच्या फळपिके व मसाला पिक स्पर्धेत गटात प्रथम बक्षीस ७ हजार, द्वितीय ६ हजार, तृतीय ५ हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येणार आहे. पशुसंवर्धन विभागात लाल कंधारी ब्रिड चॅम्पियन नर व मादी गटासाठी प्रत्येकी १ लाख २१ हजार रुपये, देवणी नर व मादी गटासाठी प्रत्येकी ७१ हजार रुपये तसेच लाल कंधारी स्पर्धेत नर व मादी गटासाठी प्रत्येकी ५१ हजार रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे. या विभागासाठी एकूण ११ लाख रुपयांची वाढ करण्यात आली आहे असे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सांगितले.माळेगाव यात्रा कुस्तीसाठी प्रसिद्ध असून, यंदा कुस्ती स्पर्धेच्या बक्षिसात प्रत्येकी १० हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकासाठी ६१ हजार, द्वितीय ५१ हजार, तर तृतीय ४१ हजार रुपये बक्षीस दिले जाणार आहे. लोकनाट्य मंडळांना प्रत्येकी ७१ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम दिली जाणार आहे. शंकरपट स्पर्धेत प्रथम ६१ हजार, द्वितीय ५१ हजार, तृतीय ४१ हजार रुपये पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. यात्रेदरम्यान येणाऱ्या विविध कलावंतांचा सन्मान करण्यात येणार असून, यात्रा प्लास्टिकमुक्त व स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासन व ग्रामपंचायतींनी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.माळेगाव यात्रेसाठी दरवर्षी जिल्हा परिषदेला २ कोटी रुपयांचा निधी मिळावा, यासाठी राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी करण्यात आली असून, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री व इतर मंत्र्यांना यात्रेचे निमंत्रण देण्यात आल्याची माहिती आमदार चिखलीकर यांनी दिली.यात्रेच्या नियोजनाबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, वीजपुरवठा व पाणीपुरवठा सुरू असून आमदार निधीतून दोन डीपी, २५ पोल व हायमास्ट दिवे बसविण्यात आले आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढविण्यात आली आहे. तलाव फुटल्यामुळे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यात्रेदरम्यान कडेकोट पोलीस बंदोबस्त, आरोग्य सुविधा व स्वच्छतेची विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना माळेगाव यात्रेचे महत्त्व समजावे यासाठी जिल्हाभरातील शाळांच्या सहली आयोजित करण्याच्या सूचनाही आमदारांनी दिल्या.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी यात्रेच्या नियोजनाची माहिती देताना सांगितले की, यंदा सीसीटीव्ही कॅमेरे वाढविण्यात आले असून तलाव परिसरात सहा जीव रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. पाणीपुरवठा, आरोग्य सेवा तसेच सहा फिरती व दहा दुरुस्त केलेली सार्वजनिक शौचालये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यात्रेचे आयोजन सुरळीत पार पाडण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा यात्रा सचिव डी.बी. गिरी यांनी केले. या बैठकीला विविध खात्यांचे विभाग प्रमुख, मंदिर समिती व ग्रामपंचायत पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

# एकास पोत्यात बांधून कार मध्ये कोंबून जिवंत पेटविले

## प्रेताची झाली राख;आरोपींना कायद्याचे नाही भय!

दैनिक वादळ वार्ता

**औसा । नदीम पटेल**

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील वानवडा रस्त्यावर दि १३ डिसेंबर २०२५ रोजी शनिवारी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास घडलेल्या एका अत्यंत धक्कादायक व अमानुष घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. एका व्यक्तीस पोत्यामध्ये बांधून कारमध्ये कोंबून त्यानंतर जिवंत अवस्थेतच कारला आग लावण्यात आल्याची संतापजनक घटनेची माहिती समोर आली आहे. या आगीमध्ये संबंधित व्यक्तीचा जागीच होरपळून मृत्यू झाला असून प्रेत पूर्णतः जळून खाक झालेची माहिती मिळत आहे.या घटनेमध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव गणेश चव्हाण असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तो एका फायनान्स (आयसीआयसी आय) कंपनीत वसुलीचे काम करत असल्याचे सांगण्यात येत आहे. ही घटना रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास घडली.

सदरील हृदय द्रावक आणि अमानुष घटनेची माहिती मिळताच औसा पोलिसांनी



तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. कार पूर्णपणे जळालेली असून आग विझविण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत संबंधित व्यक्तीचा आगीत होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला होता. प्रेत इतके जळाले होते की ओळख पटवणेही कठीण झाले होते. प्रेताची अवस्था अत्यंत गंभीर असल्याने पोलिसांनी घटनास्थळावरच रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या दरम्यान पंचनामा करून शव विच्छेदन ( पोस्टमार्टम)ची प्रक्रिया पूर्ण केली, तसेच नातेवाईकांच्या ताब्यात मृतदेह देण्याची कार्यवाही केली. दरम्यान, घटनास्थळी सापडलेल्या जळालेल्या कारच्या आधारे पोलिसांनी तपासाला गती दिली. सदर कार औसा तांडा येथील असल्याचे निष्पन्न झाले असून नंबर प्लेटच्या आधारे पोलिसांनी संबंधित वाहनधारक व त्याच्या नातेवाईकांचा शोध घेतला. याच अनुषंगाने पोलिसांनी रात्री सुमारे ३.३० वाजता औसा तांडा येथे जाऊन चौकशी सुरू केली त्यामुळे सदर व्यक्तीचे नाव समजू शकले.ही हत्या नेमकी कोणत्या कारणातून करण्यात आली, यामागे आर्थिक व्यवहार, फायनान्स, बँक वसुलीचा वाद की अन्य कोणता गुन्हेगारी कट आहे,याबाबत अद्याप कोणत्याही कारणाची स्पष्टता झालेली नाही. मात्र ही घटना अत्यंत नियोजित आणि क्रूरबद्ध पद्धतीने करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.या प्रकरणाचा अधिक तपास औसा पोलीस स्टेशनचे अधिकारी करत असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात येण्याची शक्यता आहे. या भीषण घटनेमुळे औसा तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.तर कायदा आणि सुव्यवस्था बाबत आरोपीच्या मनामध्ये कोणतीही भीती न बाळगता असे क्रूर कर्म खुलेआम केले जात असल्याने सर्व सामान्य नागरिकांचे जीवन धोकादायक झाले असल्याचे चित्र असून बीड मधील संतोष देशमुख सारखेच प्रकरण तर नाही ना?अशी चर्चा रविवारी दिवसभर तालुक्यामध्ये सुरू होती.या घटनेचा तपास पोलिसांनी ताबडतोब लावून मुख्य आरोपींना तात्काळ कड्क आणि जलद गतीने शासन झाले पाहिजे जेणेकरून अशी घटना पुन्हा घडणार नाही? याची दक्षता पोलीस खात्याने घ्यावी अशी मागणी केली जात आहे.

# मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत शासकीय आय.टी.आय.कॉलेज माजलगाव येथे कार्यक्रम संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

आज शासकीय आय.टी. आय.कॉलेज माजलगाव येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम.सी. एक्स च्या माध्यमातून आय.टी.आयच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री.एस. ओ.बनगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थितविद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना फायनान्शियल मॅनेजमेंट, फायनान्शियल मार्केट्स, डिमॅट अकाउंट,कमोडिटी चे प्रकार,जागतिक स्तरा वर सक्रिय असलेल्या कमोडिटीज,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशनक्ट,कमोडिटी व इक्विटी मध्ये असलेला फरक,तसेच सेबीच्या सारथी प चे महत्व या विषयी मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री. एन.पी.पटवी सर,डी.बी. तऊळ सर,टी.ए.इंगोले सर,ए.ए.पठाण सर, पी.के.शिंदे सर,ए.पी. राठोड सर,ए.व्ही.शिनगारे सर,पी.पी.राठोड सर, श्रीमती डी.एम.देशमुख मॅडम यांनी प्रयत्न केले व श्री.एन.पी.पटवी सर यांनी सूत्रसंचालन केले. तसेच या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परंपरागत भारतीय ज्ञान व आधुनिक विज्ञानाच्या समन्वयातून शाश्वत पर्यावरणीय भविष्यासाठी मंथन

## बामखेडा महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे यशस्वी आयोजन; जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांची विशेष उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

ग्रामविकास संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालय, बामखेडे (ता. शहादा) येथे दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी एका भव्य आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले. परंपरागत भारतीय ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांच्या एकत्रीकरणातून शाश्वत पर्यावरणीय भविष्यासाठी या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर या चर्चासत्रात सखोल मंथन करण्यात आले. या चर्चासत्राला प्रमुख मार्गदर्शक म्हणून नंदुरबार जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी सहभाग घेतला. त्यांनी जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विविध विकासात्मक व पर्यावरणपूरक उपक्रमांचा सविस्तर आढावा सादर केला. भविष्यातील शाश्वत विकासासाठी प्रशासन, संस्था व नागरिकांनी समन्वयाने काम करणे किती गरजेचे आहे, यावर त्यांनी भर दिला. स्थानिक पातळीवरील नियोजन, प्रभावी लोकसहभाग आणि



नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन या बाबी शाश्वत भविष्यासाठी निर्णायक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांनी या चर्चासत्रात आपले मत मांडले. जर्मनीचे आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ डॉ. उलरिच बर्क यांनी प्राचीन भारतीय धार्मिक विधींपैकी एक असलेल्या अग्निहोत्राच्या माध्यमातून पर्यावरणात सकारात्मक बदल कसे घडवून आणता येतात, याचे शास्त्रीय विश्लेषण सादर केले.तर सागर धारा (सल्लागार – UNEP) यांनी शाश्वत विकास प्रक्रियेत शासन, स्वयंसेवी संस्था व सामान्य नागरिकांची सामूहिक भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर प्रकाश टाकला. तसेच, प्रकल्प संचालक दीपक एस. पटेल (आत्मा) यांनी 'आत्मा' संस्थेच्या कार्याचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला.

या कार्यक्रमाला केदारनाथ कवडीवाले, अध्यक्ष – डॉ. हेडगेवार संस्था, नंदुरबार यांच्यासह विविध क्षेत्रातील अभ्यासक, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम ग्रामविकास संस्थेचे अध्यक्ष पी. बी. पटेल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव बी. व्ही. चौधरी यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. योगेश पाटील यांनी प्रभावी सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली, तर एस. एस. दुथडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# 'पाठ्यपुस्तक साधन, साध्य नाही'; कौशल्यधिष्ठित शिक्षणासाठी शिक्षकांनी'अपडेट' राहणे गरजेचे-डॉ.रमेश चौधरी

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

अध्यापक शिक्षण मंडळ, धुळे-नंदुरबार संचलित सर्व शाखांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी येथील प्राचार्य भाईसाहेब गो. हु. महाजन न्यू हायस्कूल व शि. ल. माळी महाविद्यालयात महत्त्वपूर्ण शैक्षणिक उद्बोधन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शिक्षकांना त्यांच्या व्यावसायिक क्षमतेत वाढ करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेल्या डायटचे प्राचार्य डॉ. रमेश चौधरी यांनी आपले मत मांडताना स्पष्ट केले की, पाठ्यपुस्तक हे फक्त एक साधन आहे, साध्य नाही, हे शिक्षकांनी लक्षात घ्यावे. काळानुसार शिक्षण व्यवस्थेत मोठे बदल होत असून, ज्ञानरचनावाद सुरू झाला आहे. त्यामुळे शिक्षकांनी केवळ ज्ञान देणारा न राहता, मुलांचा सुलभक बनावे आणि विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी नव्हे, तर कौशल्य आधारित शिक्षण देण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन त्यांनी केले.

संस्थेचे संस्थापक भाईसाहेब गो. हु. महाजन यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार





अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संस्थाचालक संघटनेचे नाशिक विभागीय सचिव डॉ. एन. डी. नांद्रे यांनी शिक्षकांनी काळानुरूप स्वतःला अद्ययावत करणे किती महत्त्वाचे आहे, यावर जोर दिला. त्यांनी शिक्षण क्षेत्रातील अडचणींवर मात करण्यासाठी संघटनांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या अध्यक्षा मंगला महाजन यांनी शिबिराच्या आयोजनाचे महत्त्व विषद केले. आजच्या युगात कौशल्यधिष्ठित शिक्षणाची नितांत गरज आहे, त्या अनुषंगाने शिक्षकांना आधुनिक शिक्षण पद्धतींची माहिती देण्यासाठी हे शिबिर महत्त्वाचे ठरेल, असे त्या म्हणाल्या. तसेच, शिक्षकांनीही काळानुरूप अद्यावत होत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख अतिथी म्हणून कॉलेज ट्रस्टचे संचालक अरुणकुमार महाजन, कार्यवाह आर. व्ही. सूर्यवंशी, सुधीरकुमार माळी, डी.पी. महाले, प्राचार्य डॉ. अमरदीप महाजन यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व शाखेचे मुख्याध्यापक उपस्थित होते. संचालक अजित टवाळे यांनी प्रास्ताविक केले, तर सशील पाडवी यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. अमरदीप महाजन यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या शिबिराच्या निमित्ताने संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी एका आगळ्यावेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कला, संगीत, नृत्य, नाटक, परंपरा आणि चालीरीती यांसारख्या विविध सांस्कृतिक पैलूंचे उत्कृष्ट सादरीकरण करून कर्मचाऱ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077